नि. फौ. ख. क्र.२६७/२०२२ **निशाणी क्र. १९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची जबानी**

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : **अतुल त्रिलोक पटले** |
| माझे वय | : २५ वर्षे |
| व्यवसाय | : मजुरी, |
| स्थायी पत्ता | : पंचशील नगर, हिंगणा. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. देशमुख यांच्या मार्फत**

१] पोलिसांनी मला दिनांक २०/०९/२०२१ रोजी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करतेवेळी हजर राहण्याकामी बोलावले नव्हते. असे काहीही घडले नाही की पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाच्या दिसत्या परिस्थितीचा पंचनामा केला तसेच माझ्या समक्ष एक चाकु जप्त केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे, परंतु त्यातील मजकूर मला माहीत नाही.

२] [सदर साक्षीदार हा पूर्वीच्या कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने, अभियोग पक्षाने त्यास फितूर घोषित करून त्यास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.]

३] हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २०/०९/२०२१ रोजी पोलिसांनी नविन पाण्याची टाकीजवळ, न्यु पंचशील नगर, इसासनी रोड, नागपूर येथे, माझ्या समक्ष घटनास्थळाच्या दिसत्या परिस्थितीचा तसेच चाकु जप्तीचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमोर पंचनामा केल्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तो पंचनामा वाचून व समजून घेऊन त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष दिली.

**उलट तपास आरोपीतर्फे श्री धिरज लामसोंगे यांच्या मार्फत**

४] [उलट तपास नाकारला.]

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १०/०३/२०२६ स्वा./-

ठिकाण : हिंगणा **[व्ही. आय. शेख]**

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग, हिंगणा.

नि. फौ. ख. क्र.२६७/२०२२ **निशाणी क्र. २०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ ची जबानी**

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नाव : **संतोष मारोती मेश्राम,**

माझे वय : ४४ वर्षे

कामधंदा : व्यवसाय,

स्थायी पत्ता : पंचशील नगर, हिंगणा.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. देशमुख यांच्या मार्फत**

१] माझ्या समक्ष काहीही घडले नाही. घटना काय घडली मला माहीत नाही. मला फक्त इतकेच माहीत आहे की, नरेश बावणे व करण वाल्मीक यांच्यात काहीतरी झगडा झाला होता. परंतु मी झगडा समक्ष पाहिलेला नाही. पोलिसांनी माझी चौकशी केली नव्हती. पोलिसांनी माझा बयान नोंदविला नव्हता.

२] [सदर साक्षीदार हा पूर्वीच्या कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने, अभियोग पक्षाने त्यास फितूर घोषित करून त्यास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.]

३] हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९/०९/२०२१ रोजी रात्री ११.०० वाजेच्या दरम्यान आरोपी नरेश बावणे याने करण वाल्मीक याला चाकुने त्याच्या कानाच्या खाली तसेच पसलीवर मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर घटना समक्ष पाहिली होती.

४] आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविण्यात आला तो मी पोलिसांना सांगितला नव्हता पोलिसांनी माझ्या जबाबात तसे का लिहून घेतले आहे याचे कारण मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास संपला

**उलट तपास आरोपीतर्फे श्री धिरज लामसोंगे यांच्या मार्फत**

५] [उलट तपास नाकारला.]

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १०/०३/२०२६

स्वा./-

ठिकाण : हिंगणा

**[व्ही. आय. शेख]**

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग, हिंगणा